क्र.आस्था/प्रशा-२/विचौ/परिपत्रक/२०१४
सहकार आयुक्त व निबंधक,सह.संस्था.
महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालय
दिनांक :- नोव्हेंबर २०१४.
03 DEC 2014

विषय:- विभागीय चौकशीच्या अनुषगांने सादर करण्यात येणा-या प्रस्तावाबाबत.

परिपत्रक

विभागीय स्तरावरील विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (प्रशासन / लेखापरीक्षण) कार्यालयाकडुन तसेच मुख्यालयातील विविध कार्यासनाकडुन राजपत्रित अधिकारी यांचेविरुध्द विभागीय चौकशी / शिस्तभंग विषयक पुढील कार्यवाही करण्याचे अनुषंगाने अनेक प्रस्ताव आस्थापना शाखेकडे प्राप्त होत असतात. सदरचे प्रस्ताव हे आस्थापना शाखेमार्फत आवश्यकतेनुसार राजपत्रित अधिकारी यांचे प्रकरणी नियुक्ती व शिस्तभंगविषयक प्राधिकरण हे शासन असल्यामुळे शासनास सादर करावे लागतात.

अशा विविध कार्यालयाकडुन/ कार्यासनाकडुन प्राप्त झालेले सदरचे प्रस्ताव / धारीकांचे अवलोकन केले असता अशा बाबी निदर्शनास आलेल्या आहेत की, राजपत्रित अधिकारी यांचे विरुध्द निश्चित करावयाचे दोषारोपा संदर्भात कोणतीही पुराव्याची कागदपत्रे संबंधित प्रस्ताव / धारीकामध्ये उपलब्ध नसतात. दोषारोप सिध्द होण्यासाठी कोणत्याही साक्षीदारांची नावे पदनाम नमुद केलेली नसतात. तसेच नेमक्या कोणत्या बाबींचे/ नियमांचे/ शासन निर्णयातील तरतुदीचे उल्लघंन केलेले आहे याबाबी देखील स्पष्टपणे नमुद केलेल्या नसतात.

विभागीय स्तरावरुन प्राप्त होणा-या प्रस्तावामध्ये विभागीय सहनिबंधक यांनी व कार्यासनाकडुन प्राप्त होणा-या प्रस्तावामध्ये संबधीत कार्यासन अधिकारी यांनी प्रस्तावाचे अनुषंगाने छाननी करुन त्यांचे कोणतेही स्पष्ट मत/ अभिप्राय न देता व संपुर्ण प्रकरण व तदअनुषंगीक बाबी व नियमातील तरतुदी विचारात न घेताच केवळ मोघम स्वरुपात टिपणी सादर करुन केवळ जबाबदारी झटकण्याचे अनुषंगाने सदरच्या धारीका आस्थापना शाखेकडे पुढील कार्यवाहीस्तव वर्ग केल्या जातात व अनेक प्रकरणात माहीती अधिकारात सदर प्रकरणातील पुढील कार्यवाही ही आस्थापना कार्यासनाकडुन हाताळण्यात येत असल्याचे व आस्थापना कार्यासनाकडे संपर्क करण्याबाबत किंवा अर्जदाराचे अर्ज आस्थापना कार्यासनाकडे वर्ग केले जातात. वस्तु:त कोणतेही अभिप्राय/ मत न देता केवळ मोघमपणे टिपणी टाकुन धारीका वर्ग करणे ही बाब अत्यंत गंभीर आहे.

बहुतांश प्रकरणात राजपत्रित अधिकारी यांचे विरुध्द प्राप्त तक्रार अर्ज हे आस्थापना कार्यासानाकडे वर्ग केले जातात. तक्रार अर्जावरील कार्यवाही ही आस्थापना कार्यासनाकडुन होत नाही. मुळ तक्रार अर्ज हा एकतर या कार्यालयाकडे तक्रार अर्जाचे अनुषंगाने आवश्यक कार्यवाहीसाठी निर्माण करण्यात आलेल्या दक्षता कक्षाकडुन किंवा तक्रार अर्जातील मुळ मुद्या वा तक्रार ज्या कक्षाशी संबधीत आहेत त्या संबधीत कक्षाने स्विकारुन व तक्रार अर्जाची छाननी/ चौकशी होते करुन संबधीतांविरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे उचित आहे अशा ठाम निर्णयाप्रत संबधीत कक्ष येत असल्यास प्रकरणांची संपुर्ण धारीका/ कागदपत्रे/ चौकशी अहवाल, त्यांचे स्वयंस्पष्ट अभिप्रायासह पुढील प्रशासकीय कार्यवाहीसाठी (संबधीत अधिकारी यांची विभागीय चौकशी /निलंबन यासाठी) आस्थापना कार्यासनाकडे वर्ग करणे अपेक्षीत आहे. व संबधीत कक्षाचे अभिप्राय विचारात घेऊन आस्थापना कार्यासनातील विभागीय चौकशी कक्षाकडुन पुढील प्रशासकीय/ विभागीय चौकशीची कारवाई केली जाते. मात्र या कार्यालयातील विविध कार्यासनाकडुन (प्रामुख्याने नागरी बँक शाखा/पतसंस्था शाखा/ अर्थशाखा/ दक्षता कक्ष/ कर्जमाफी शाखा/ गृहनिर्माण शाखा) प्राप्त धारीका किंवा प्रस्ताव पहाता, अत्यंत मोघमपणे व कोणतेही अभिप्राय न देता अनेक धारीका

पुढील कार्यवाहीसाठी आस्थापना कार्यासनाकडे पाठविण्यात येत असल्याचे निदर्शनास आलेले आहे त्याचा परिणाम म्हणून संबधीत जबाबदार असणा-या अधिका-यांवर निश्चित करण्यात येणारे दोषारोप केवळ तुटपुंज्या माहीतीवर व नियमातील योग्य त्या तरतुदींचा उल्लेखा अभावी तयार केले जातात. तसेच शासन स्तरावरुन काही कागदपत्रांवर अथवा मुद्यांवर माहीतीची मागणी केला असता, वारंवार पाठपुरावा करुनही माहीती प्राप्त होत नाही व परीणामी अपु-या व अर्धवट माहीतीवर दोषारोप तयार करुन विभागीय चौकशीची कारवाई आदेशीत केली जाते. परीणामी भविष्यात सदर दोषारोप पुराव्याअभावी चौकशीच्या कार्यवाहीत सिध्द होत नाहीत व विभागीय चौकशीची कार्यवाही निष्क्रीय ठरते तसेच संबधीत अधिकारी हे सदर कारवाईच्या विरुध्द मा.न्यायालयात / मॅट मध्ये गेल्यानंतर त्यानुषंगाने न्यायालयात शासनाची व सहकार आयुक्त कार्यालयाची बाजू मांडताना पुरेशा माहीतीअभावी अडचणी निर्माण होतात.

उपरोक्त सर्व बाबी विचारात घेता, एखाद्या घटनेच्या / बाबींच्या अनुषंगाने संबधीत जबाबदार अधिका-या विरुध्द विभागीय चौकशीचा प्रस्ताव आस्थापना कार्यासनाकडे पाठविताना संबधीत विभागीय सहनिबंधक यांनी / संबंधित कार्यासन अधिकारी यांनी त्यांचे प्रस्तावात पुढील बाबींचा समावेश करावा -

१. संबंधित विषयाची धारीका / प्रस्ताव आस्थापना कार्यासनाकडे पाठविण्यापुर्वी ज्या अधिका-याविरुध्द कार्यवाही करावयाची आहे अशा अधिका-याकडून ज्ञापनाद्वारे खुलासा प्राप्त करुन घ्यावा व प्राप्त झालेल्या खुलाशावरुन काही प्रश्न उपस्थित झाल्यास अशा मुद्यांवर पुनश्च ज्ञापन देवून पुराव्यासह स्वयंस्पष्ट खुलासा सादर करण्याच्या सुचना दयाव्यात.

२. तदनंतर प्राप्त होणा-या खुलाशावर कार्यालयाचे / कार्यासनाच्या स्तरावर अचूक छाननी करण्यात यावी. ज्या अधिका-याविरुध्द कार्यवाही करावयाची आहे त्या अधिका-यांने नियमातील कोणत्या बाबींचे / तरतुदींचे उल्ल्ंघन केलेले आहे यावर संबधीत कार्यासन अधिकारी यांनी जाणिवपुर्णक स्पष्ट मत/ अभिप्राय नोंदवावेत.

३. विभागीय चौकशीचा प्रस्ताव पाठविताना जोडपत्र १ मध्ये संबंधितांनी कोणत्या कायदयातील / नियमातील/ शासन निर्णयातील/ शासन परिपत्रकातील तरतुदींचे उल्लघंन केलेले आहे याबाबत थोडक्यात दोषारोप नमुद करावा.

४. जोडपत्र २ मध्ये सबंधितांवर ठेवावयाच्या दोषारोपाचे अभिकथनामध्ये प्रकरणाच्या सुरुवातीपासुन ते संबंधित अधिका-यांने नियमबाहय कृती करेपर्यंतची संपुर्ण माहिती सविस्तर नमुद करावी. तसेच सदर दोषारोपांचे अनुषंगाने अन्य साक्षीदार व कागदपत्रांचा उल्लेख असेल तर तो करुन नियमातील नेमकी तरतुद आणि उल्लंघन केलेली बाबी यावर सविस्तर विवेचन करावे.

५. जोडपत्र ३ मध्ये संबंधितांवर ठेवावयाच्या दोषारोपांच्या सिध्दतेसाठी आवश्यक असणा-या साक्षीदारांची यादी- नाव,पदनाम कार्यालयाचे नाव, कार्यकाल, दुरध्वनीक्रमांक इत्यादी सविस्तर तपशिल नमुद करण्यात यावा.

६. जोडपत्र ४ मध्ये उपरोक्त दोषारोप कागदोपत्री पुराव्यानिशी सिध्द होण्यासाठी दोषारोपानिहाय सर्व दस्तऐवजाची क्रमवार व दिनांक निहाय यादी जोडण्यात यावी व त्यासोबत संबंधित कागदपत्रे साक्षांकीत करुन संलग्न करण्यात यावी.

वरीलप्रमाणे परिपुर्ण प्रस्ताव संबधीत विभागीय सहनिबंधक / कार्यासन अधिका-यांच्या शिफारशीसह आस्थापना कार्यासनास सादर करण्यात यावा. शासनस्तरावरुन आदेशीत करण्यात येणा-या विभागीय चौकशी प्रकरणात ज्या अधिकारी यांनी प्रस्ताव पाठविलेला आहे त्या अधिकारी यांना प्रस्तावाची संपुर्ण व पूरेपूर माहीती असल्यामुळे त्यांना प्रकरणातील दोषारोप सिध्द करण्यासाठी शासनाचे वतीने साक्षिदार/ सादरकर्ता अधिकारी म्हणुन नियुक्त केले जाण्याची शक्यता असते व विभागीय चौकशी नियम पुस्तिका १९९१ मधील तरतुदी विचारात घेता, विभागीय चौकशीमध्ये सदर दोषारोप सिध्द होण्यासाठी शासनाचे वतीने बाजु मांडण्याची संपुर्ण जबाबदारी सादरकर्ता अधिकारी यांची असते या बाबी विचारात घेऊन, उपरोक्त प्राप्त होणा-या प्रस्ताव / धारीकेवरुन भविष्यात दोषारोप सिध्द न झाल्यास किंवा तुटपुंज्या

पुराव्या अभावी अपचारी निर्दोष सुटल्यास त्याची जबाबदारी संबंधित कार्यालय प्रमुख / कार्यासन अधिका यांची असल्याने प्रथम भक्कम पुरावे तपासून खात्री करावी व उपरोक्त सर्व बाबींचा विचार करुन परीपुर्ण प्रस्ताव आस्थापना कार्यासनाकडे शासनास सादर करण्यासाठी पाठविले जातील याची सर्व विभागीय सहनिबंधक / कार्यासन अधिकारी यांनी गंभीरपणे नोंद घ्यावी.

( दिनेश ओऊळकर )
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे .

प्रति,

१. विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था,(प्रशासन / लेखापरीक्षण) सर्व
२. कार्यासन अधिकारी (सर्व) मुख्यालय,पुणे
३. अपर आयुक्त व विशेष निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. अपर निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत माहीतीस्तव सविनय सादर-**

मा.सचिव(सहकार),सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई-३२